**रे.दि.मू.नं. ८४/२०११ मधील नि. ८४ खालील आदेश**
**( प्रकाश शहा विरूध्द राजेंद्र खोमणे )**
**(आदेश पारीत दि. १४/११/२०१८)**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी तर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करून मिळणेकरिता दाखल केला आहे.

२. वादींचे कथन असे की सदरचा दावा हा दावा मिळकत सि.स.नं. ४७ याचा सर्व्हे नं. ३७१ मध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करून केलेले बांधकाम काढून सदर जागेचा कब्जा वादीस देणेबाबत दाखल केला आहे. प्रतिवादींनी कैफियत दाखल करून वादीचे कथन नाकारलेले आहे. त्यामुळे प्रत्यक्ष जागेवर काय वस्तुस्थिती आहे हे मे.कोर्टापुढे येणे अंतिम न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. सबब कोर्ट कमिशनरची नेमणूक व्हावी याकरिता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदरकामी यातील प्रतिवादीने नि. ८५अ वर म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की वादीने सदरचा दावा हा मोजणी नकाशावरून आणला आहे व तसा नकाशा वादीने दाव्यात दाखल केला आहे. नकाशाप्रमाणे दावा मिळकतीची वस्तुस्थिती रेकॉर्डवर आली आहे. वादी हा दावा मिळकतीचे फोटो काढून दावा मिळकतीची प्रत्यक्ष वस्तुस्थिती रेकॉर्डवर आणू शकतो. त्यामुळे कोर्ट कमिशनची आवश्यकता नाही. केवळ सदर दाव्याचे कामकाज लांबवणेचे हेतूने सदरचा अर्ज दाखल केला आहे. सबब अर्ज फेटाळणेत यावा अशी विनंती केली.

४. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांची पाहणी केली असता असे दिसून येते की प्रस्तुतचा दावा हा सि.स.नं. ४७ याचा सर्व्हे नं. ३७१ मध्ये प्रतिवादींनी अतिक्रमण करून केलेले बांधकाम काढून जागेचा कब्जा वादीस देणेबाबत हुकूम होणेकरिता दाखल केला आहे. वादीने केलेले कथन व प्रतिवादीचे कथन स्पष्ट होण्यासाठी तसेच प्रत्यक्ष जागेवर काय वस्तुस्थिती आहे हे मे. कोर्टापुढे येणे अंतिम न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे मौजे लोणंद येथील सि.स.नं. ४७ याचा सर्व्हे नं. ३७१ ची मोजणी करून त्याठिकाणी असणारी वस्तुस्थिती रेकॉर्डवर येणेसाठी कोर्ट कमिशनर यांची नेमणूक करणे न्यायोचीत वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

<u>**आदेश**</u>

**१.** नि. ८४ चा अर्ज मंजूर करणेत येतो.

**२.** ॲड. श्री.ए.सी.फडके यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करणेत येते.

**३.** कोर्ट कमिशनर यांना असा आदेश देणेत येतो की त्यांनी मौजे लोणंद ता. खंडाळा, जि. सातारा येथील सि.स.नं. ४७ याचा सर्व्हे नं. ३७१ या मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी करून त्याप्रमाणे जागेवरील परिस्थितीप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक नकाशा व रिपोर्ट सदर आदेशापासन एक महिन्याचे आतमध्ये दाखल करावा.

**४.** वादींना असा आदेश देणेत येतो की त्यांनी कोर्ट कमिशनर यांची फी रक्कम रूपये १५००/— रूपये देणेत यावी.

**५.** मोजणी करणेपूर्वी वादी व प्रतिवादी यांना मोजणीबाबत नोटीस द्यावी.

**दि. १४/११/२०१८**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**